आर.सी.सी.क्रं.३०७/२००८
नि. क्रमांक ३३ खालील साक्ष

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक १ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :-

माझे नाव :- संतोष बबन सावळे,

वय सुमारे :- ४५ वर्षे, व्यवसाय :- खाजगी नोकरी ,

निवासस्थान :- चाकण, ता. खेड, जि. पुणे.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री एस. एस. पवार यांच्यामार्फत**

सन २००८ मध्ये मी मौजे दिवड येथे आई वडील, पत्नी व मुले असे राहत होतो. मी आरोपींना ओळखतो कारण ते आमच्या गावातील रहीवासी आहेत. सन २००८ मध्ये सायंकाळी १०-११ वाजण्याच्या सुमारास तीन चार लोक तोंड बांधून आमच्या घरी आले होते. सदर चार इसमांनी आमचा दरवाजा ठोठावला व आम्हास मारहाण चालू केली. मी आरोपींविरुध्द गैरसमजुतीमुळे फिर्याद दिली होती. आरोपींनी मला, माझ्या वडिलांना मारहाण केली असे काही घडले नव्हते. आता मला मी नोंदवलेली खबर दाखवण्यात आली. खबरेवर माझी सही आहे. खबरेतील मजकूर मला आठवत नाही. खबरेवरील सहीस **नि. क्र. ३४/ क** देण्यात येतो. छापील खबरेवर माझी सही आहे. छापील खबरेतील मजकूर मला आठवत नाही. छापील खबरेवरील सहीस **नि. क्र. ३५/ क** देण्यात येतो.

**साक्षीदार सहकार्य करत नसल्याने भारतीय पुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे सरकारी विधीज्ञ यांना साक्षीदारास सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात येते.**

०२. हे म्हणणे खरे नाही की, दि.२१/०६/२००८ रोजी आमच्या गावातील ग्रामपंचायत सरपंचाची व उपसरपंचाची निवडणुक झाली होती त्यामुळे मी फटाके वाजवत होतो. हे म्हणणे खरे नाही की, फटाके वाजवण्याच्या कारणावरुन माझे चुलते, चुलती चंद्रभागा यांच्यामध्ये व आरोपिंमध्ये भांडणे झाली होती व मिटली होती. हे म्हणणे खरे नाही की, दि. २३/०६/२००८ रोजी आम्ही जेवण करुन झोपलो असता रात्री ११ वाजण्याच्या सुमारास आमच्या घराचे दार ठोठावले व चार इसमांनी आम्हास शिवीगाळी व दमदाटी करुन हाताबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. हे म्हणणे खरे नाही की, मी ओरडण्याचा आवाज ऐकल्यानंतर माझे आई वडील जागी झाले व त्यानंतर आरोपी राजु सावळे याने माझ्या वडिलांच्या दोन्ही पायांवर काठीने मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी राजू सावळे

याने लोखंडी पट्टीने माझ्या वडिलांच्या डाव्या खांदयावर मारहाण करुन खांदयाचे हाड मोडले.

०३. हे म्हणणे खरे नाही की, इतर तीन आरोपींनी माझी आई सुभद्रा हिस मारहाण करुन दमदाटी केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी घरातील सामानाची नासधूस केली व बाहेर उभी असलेली मोटरसायकलच्या काचा फोडल्या. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी आम्हाला गावामध्ये कसे राहता असे म्हणून दमदाटी केली. हे म्हणणे खरे नाही की, मारहाणीनंतर मी आरोपिंविरुध्द पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. माझे वडील मयत झालेले आहेत. माझी आई जिवंत आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमच्यामध्ये व आरोपींमध्ये तडजोड झालेली आहे. मी आरोपींना ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना वाचवण्यासाठी मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरकारी वकिलांतर्फे उलटतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विद्वान वकिल श्री. एस. डी. काळे यांच्यातर्फे शपथेवर सुरु.</u>**

०४. हे म्हणणे खरे आहे की, दि. २१/०६/२००८ रोजी सायंकाळी चार इसम आले होते व त्यांनी त्यांचे तोंड बांधलेले असल्यामुळे मी त्यांना ओळखत नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, मला व माझ्या आई वडिलांना मारहाण करतेवेळी आरोपींनी तोंड बांधलेले असल्यामुळे मी त्यांना ओळखत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपींविरुध्द गैरसमजुतीमुळे तक्रार नोंदवली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या तक्रारीतील मजकुर पोलीसांनी लिहीला होता त्यामुळे त्यातील मजकुर मला आठवत नाही. माझी आरोपीविरुध्द कोणतीही तक्रार नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आई वडिलांची देखील आरोपींविरुध्द कोणतीही तक्रार नाही. मला आरोपीविरुध्द केस चालवायची नाही.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

Sd/xxx

**दिनांक. ११/०८/२०२६**

**(श्री. व्ही. आर. डोईफोडे)**

**४ थे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी**

**वडगाव, ता.मावळ, जि. पुणे.**